MHRG070006092021

| | |
|---|---|
| केस दाखल दिनांक | २०/०५/२०२१ |
| केस नोंदणी दिनांक | २०/०५/२०२१ |
| केस निकाल दिनांक | ०७/०४/२०२६ |
| कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०४ १० १८ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत, जि. रायगड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – श्रीम. ए. एस. वाडकर)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१७९/२०२१**
**निशाणी क्र.२२**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन, वनविभाग अलिबाग यांच्यातर्फे<br>श्री. एस. डी. वळवी, वनपाल– कर्जत, |
| महाराष्ट्र शासनतर्फे | श्रीम. सरोज नागोठकर, सहा. सरकारी अभियोक्ता<br>श्री.प्रदीप शिरसाट,सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **१. गजानन काळू पवार**<br>वय : ६९ वर्षे, धंदा : मजुरी,<br>राहणार : मालेगाव, ता . कर्जत<br>जि. रायगड |
| आरोपीतर्फे वकील | श्री. गितेश सावंत. |

**(भाग "ब")**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०१/०४/२०१० |
| गुन्हा नोंदणी तारीख | ०१/०४/२०१० |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २०/०५/२०२१ |
| दोषारोप निश्चित तारीख | १३/१२/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २१/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | ... |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | ०७/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, जर असेल तर | निरंक |

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | शिक्षा दिली किंवा निर्दोष मुक्तता | किती शिक्षा दिली | खटला सुरु असताना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गजानन काळू पवार | ०२/०४/२०२० | १५/०४/२०२० | वन्यजीवन संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम २,९, ३९,४८,५०,५१ व भारतीय वनअधिनियम १९२७ चे कलम २६ (१) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## (भाग "क")

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे साक्षीदारांचा तपशील :-**

**अभियोग पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | सोनल दत्तात्रय वळवी | १३ |
| २ | उमेश अरुण कांबळे | १९ |

**आरोपी पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील** :–

**अभियोग पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | जप्ती पंचनामा | १४ |

**आरोपी पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**मुद्देमालाचा तपशील** :–

| अ.क्रं. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
## (जाहिर दिनांक ०७/०४/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द वन्यजीवन संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम २, ९, ३९, ४८, ५०, ५१ व भारतीय वनअधिनियम १९२७ चे कलम २६ (१) अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

०२. दिनांक ३१/०३/२०२० रोजी मौजे, कोंठीबा क. न. २३ व मालेगाव कर्जत येथे वनपरिमंडळ अधिकारी धामणी व वनरक्षक धामणी

यांनी त्यांना मिळालेल्या गुप्त बातमीनुसार विशेष पथक घेवून जंगल परिसर व भरती केली असता शेंड्याच्या कापरा नाल्यामध्ये बिबट जातीचा प्राणी विषारी औषध घालून शिकार करुन त्याची नखे व दात काढून त्याचे शव जळलेल्या अवस्थेत सापडले. त्यांनी आरोपीकडे चौकशी केली असता, आरोपीच्या ताब्यातून त्यांनी १७ बिबट्याची नखे व चार दात त्यांच्या घरी लपवून ठेवलेले पंचसमक्ष हस्तगत केले. सदर आरोपी गजानन पवार याने वन्य प्राणी बिबटयाची शिकार करुन त्यांचे नखे व दात काढून घरी लपवून ठेवले असल्यामुळे व तसेच बिबट्याचा मृत्यदेह जाळल्यामुळे फिर्यादीने सदरची फिर्याद दाखल केली.

०३. आरोपी यांचेविरुध्द वन्यजीवन संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम २, ९, ३९, ४८, ५०, ५१ व भारतीय वनअधिनियम १९२७ चे कलम २६ (१) अन्वये निशाणी क्र.८ प्रमाणे आरोपींचे प्रतिकथन नोंदविले. आरोपींनी आरोप नाकारुन संपरिक्षेची मागणी केली. निशाणी क्र.२१ येथे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले.

०४. आरोपीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर घटनेबाबत कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. त्यावरुन आरोपींनी गुन्हा केला नसल्याचे सिध्द होते. अशा परिस्थितीत अभियोग पक्षाचा पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपी हे निर्दोषमुक्त होण्यास पात्र असल्याचे दिसुन येते. सदर विधीज्ञांनी आरोपींना निर्दोषमुक्त करण्याची विनंती केली.

०५. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असा

युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा देऊन आरोप सिध्द केलेले आहेत. सरकारी वकीलांनी आरोपीस अभियोग पक्षाचा पुरावा लक्षात घेता शिक्षा करण्याची विनंती केली आहे.

०६. फिर्यादी पक्षाचा पुरावा व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष व त्यासाठीचे कारणे खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.नं.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, दिनांक ३१/०३/२०२० रोजी मौजे, कोंठीबा क. न. २३ व मालेगाव कर्जत येथे आरोपीने वन्य प्राणी बिबटयाची शिकार करुन त्यांचे नखे व दात काढून घरी लपवून ठेवले व तसेच बिबट्याचा मृत्यदेह जाळला का ? | | **नकारार्थी.** |
| २. | काय आदेश ? | | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ बाबत</u>** –

०७. अभियोग पक्षाचे कथन असे आहे की, सदर आरोपी गजानन पवार याने वन्य प्राणी बिबटयाची शिकार करुन त्यांचे नखे व दात काढून घरी लपवून ठेवले व तसेच बिबट्याचा मृत्यदेह जाळला. सदर कथन सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने साक्षीदार क्रं.२ उमेश अरुण कांबळे यांना निशाणी क्रं.१९ वर तपासलेले आहे. सोनल दत्तात्रय दळवी साक्षीदार क्र.१ (निशाणी क्रं.–१३) वर सरतपास नोंदविण्यात आलेला होता परंतु सदर साक्षीदार ही उलटतपासासाठी उपस्थित न राहील्यामुळे सदरचा पुरवा हा रद्द करण्यात आला.

०८. साक्षीदार क्रं.२ उमेश अरुण कांबळे यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक ३१/०३/२०२० रोजी वनक्षेत्रपाल यांनी त्यांना मालेगाव येथे बोलावले होते, तेथे ते व सदानंद निरगुडा असे दोघे पंचनाम्यासाठी गेलो होते, गजानन काळू पवार यांच्या घरासमोर ते गेले असता तेथे त्यांना सांगितले की, एक बिबटया मृत अवस्थेत त्यांच्या घराच्या पाठीमागे जंगलात सापडलेला आहे, पोलीसांनी गजानन काळू पवार यांच्याकडे चौकशी केली, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली, थोडया वेळाने कसुन चौकशी केल्यानंतर त्यांनी बिबटया मृत अवस्थेत असल्याचे माहीत असल्याचे कबुल केले, त्यानंतर गजानन पवार हे त्यांना घटनास्थळी घेऊन गेले, आरोपीने त्यांना बिबट्याचे दात व नखे काढल्याचे सांगितले, त्यांनी सदरचे दात व नखे त्यांच्याकडे नसुन ती बायकोकडे ठेवल्याचे सांगितले व त्यांनी बायकोला काढून देण्यास सांगितले, सदरचे दात व नखे ही त्यांनी त्यांच्या घराच्या शेजारील असलेल्या शेतात एका प्लॅस्टीकच्या पिशवीत पुरले होते, त्यांच्या पत्नीने सदरचे दात व नखे हे शेतातुन काढून दिले, सदरची पिशवी ही तिने गजानन यांच्याकडे दिली, त्यांनी ती पिशवी उघडून दाखविली, त्यामध्ये बिबटयाची १७ नखे व ४ दात होते. सदरचे दात व नखे वनक्षेत्रपाल यांनी जप्त केली, दुसऱ्या दिवशी दिनांक ०१/०४/२०२० रोजी ते पुन्हा घटनास्थळी गेले होते, त्यावेळेस आरोपीने त्यांना घटनास्थळी नेले, घटनास्थळ हे त्यांच्या घरापासुन २० ते २५ मिनीटाच्या अंतरावर जंगलात होते, तेथे गेल्यावर त्यांना बिबटयाचे अर्धवट जळालेले शरीर दिसले, आजुबाजुला पाहिले असता तेथे देखील बिबटयाचे काही अवशेष पडलेले होते, त्यानंतर वनक्षेत्रपाल यांनी वैद्यकीय अधिकारी यांना बोलावले व त्यांच्यासमक्ष पंचनामा करण्यात आला, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सदर मृत अवस्थेत असलेल्या बिबटयाचे शवविच्छेदन केले व अहवाल दिला, त्यानंतर उर्वरित अवशेषाची घटनास्थळीच विल्हेवाट

लावण्यात आली व काही अवशेष उरले नसल्याची खात्री केली, त्यानंतर सदर बिबट्याचे अवशेष नष्ट केल्याबाबत पंचनामा करण्यात आला.

०९. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये असे कथन केले की, वनक्षेत्रपाल यांनी त्यांना फोनद्वारे बोलावले होते, ते वनमजुर असल्यामुळे त्यांचा त्यांच्याशी संपर्क होता, पंचनाम्याच्या वेळेस ते गेले. जेथे नखे व दात पुरुन ठेवण्यात आले होते, त्या ठिकाणी जप्ती पंचनामा करण्यात आला नव्हता. घटनास्थळावरुन त्यांच्यासमक्ष वनक्षेत्रपाल यांनी कोणतेही ज्वलनशील पदार्थ जप्त केले नव्हते.

१०. प्रस्तुत प्रकरणात तपासलेले साक्षीदार क्र.२ हे पंचनाम्याचे पंच आहेत. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी व इतर साक्षीदारांना हजर ठेवण्यात अभियोग पक्षास अपयश आलेले आहे. फौजदारी प्रकरणात आरोपीविरुध्द आरोप हे संशयाच्या पलीकडे जाऊन सिध्द करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणातील एकंदर पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपींनी घटनेच्या दिवशी घटनास्थळावर वन्य प्राणी बिबटयाची शिकार करुन त्यांचे नखे व दात काढून घरी लपवून ठेवले व तसेच बिबट्याचा मृत्यदेह जाळल्याबाबतचा ठोस पुरावा अभिलेखावर आलेला दिसुन येत नाही. अशा परिस्थितीत आरोपी हा संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत</u>** –

११. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्ष हा आरोपींचा गुन्हा सिध्द करण्यास पूर्णतः अपयशी ठरला आहे. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त

होण्यास पात्र आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता, मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षान्वये मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | **आरोपी गजानन बाळू पवार** यांना वन्यजीवन संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम २, ९, ३९, ४८, ५०, ५१ व भारतीय वनअधिनियम १९२७ चे कलम २६ (१) गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया सहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे जामीन व बंधपत्रे रद्द करण्यात येतात. |
| ३. | या न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील झाल्यास त्याकामी हजर होणेकरिता आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार रुपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र द्यावयाचे आहे. |
| ४. | प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यात आलेला असल्यामुळे त्याबाबत आदेश नाही. |
| ५. | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.) |

Sd/-

दिनांक – ०७/०४/२०२६

**(श्रीमती ए. एस. वाडकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत,
जि. रायगड